# मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक), ठाणे यांचे कार्यालय

## शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामाकरिता घेण्यासाठी जाहीरात (विधी सल्लागार - 01 पद)

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2715/प्र.क्र.100/13, दिनांक 17/12/2016 व शासन महसुल व वनविभागाकडील पत्र क्रमांक एस-30/12/2012/प्र.क्र.233/फ-6, दिनांक 26/11/2019 चे अनुषंगाने ठाणे वनवृत्तांतर्गत सर्व वनविभाग तसेच उप वनसंरक्षक (वन्यजीव), ठाणे या विभागांसाठी वनविभागातील जमीन विषयक, वनगुन्हे, आस्थापना विषयक तसेच इतर न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणाचा तातडीने पाठपुरावा करुन निपटारा करण्यासाठी तसेच इतर विवक्षित सेवा/कामासाठी एमपॅनलमेंट (Empanelment) करुन सेवानिवृत्त अधिकारी ज्यांना विधी विषयक कामकाजाचा अनुभव आहे / सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, सेवानिवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, सेवानिवृत्त प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी दिनांक 17/12/2016 च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती पुर्ण करीत असलेल्या इच्छुक व पात्र सेवानिवृत्त अधिकारी यांचेकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

वरील कामाकरिता इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी ज्यांना विधी विषयक कामकाजाचा अनुभव आहे / सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, सेवानिवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, सेवानिवृत्त प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांना कामाचे आवश्यकतेनूसार सेवाकरार पद्धतीने प्रथमत: 1 वर्षाकरिता घेण्यात येतील व आवश्यकतेप्रमाणे सदर कालावधी करार वाढविण्यात येईल. मात्र असा एकुण कालावधी 3 वर्षापेक्षा जास्त असणार नाही. उक्त शासन निर्णयाची प्रत www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन त्याचा संगणक संकेतांक 201612171718241307 असा आहे.

सेवा करार पध्दतीने भरावयाची पदसंख्या

| अ. क्र. | पदाचे नाव | संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | विधी सल्लागार | 01 | ठाणे वनवृत्तांतर्गत सर्व वनविभाग कार्यालये तसेच उप वनसंरक्षक (वन्यजीव), ठाणे या विभागांसाठी वनविभागातील जमीन विषयक, वनगुन्हे, आस्थापना विषयक तसेच इतर न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणाचा तातडीने पाठपुरावा करुन निपटारा करण्यासाठी |

1) अर्हता व अनुभव :-

१. मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायदयाचा पदविधर व सनदधारक

२. सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधिश / अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश / सेवानिवृत्त प्रथम वर्ग कनिष्ठ स्तर न्यायदंडाधिकारी किंवा सरकारी किंवा सार्वजनिक उपक्रमामध्ये विधी सल्लागार म्हणुन २० वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेले उमेदवारांना प्राधान्य राहील व असे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर किमान ७ वर्षापासुन वकिली व्यवसाय करत असलेल्या उमेदवारांचा विचार करण्यांत येईल.

३. उमेदवार वन विषयक, फौजदारी व दिवाणी विषयक, सेवा व आस्थापना तसेच कामगार विषयक बाबींत ज्ञानसंपन्न असावा.

४. उमेदवारास मराठी, इंग्रजी व हिंदी भाषांचे पुरेसे ज्ञान असावे.

५. करार पद्धतीने नियुक्ती करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांचेकडे आवश्यक क्षमता असावी.

६. करार पद्धतीने नियुक्ती करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी,यांचे विरुद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**2) कर्तव्ये व जबाबदा-या :**

१. संबंधित वन अधिका-याकडुन विधी विषयक सल्ला देण्याबाबत लेखी स्वरुपात संदर्भ प्राप्त झाल्यावर त्यांना लेखी स्वरुपात सल्ला देणे.

२. वनगुन्हे प्रकरणी आरोपींना ताब्यात घेणे बाबत न्यायालयाकडुन आवश्यक कालावधी वाढवून घेणे,

३. सरकारी वकिल यांच्याशी समन्वय साधुन त्यांच्या अनुपस्थितीत न्यायालयात विभागाच्या वतीने म्हणणे सादर करणे/ बाजू मांडणे.

४. वनविभागांच्या जुन्या न्यायालयीन प्रकरणी आढावा व पाठपुरावा करणे व यासाठी आवश्यक ती सरकारी वकीलाची मदत घेणे.

५. वनविभागांच्या वतीने न्यायालयात प्रतिज्ञापत्र, परिच्छेद निहाय उत्तर दाखल करणे व कायदे विषयक सल्ला देणे.

६. ठाणे जिल्हयातील तालुका व जिल्हा न्यायालयामध्ये व इतर न्यायाधिकरणापुढे वनविभागांच्या वतीने बाजु मांडणे,

७. वनविभागांशी निगडीत असलेल्या वनविभागाने दाखल केलेल्या व त्यामध्ये आरोपी असलेल्या कोणत्याही प्रकरणी खाजगी वकिल पत्र घेता येणार नाही.

८. वन विभागातर्फे दाखल करावयाचे परिच्छेदनिहाय अभिप्राय / शपथपत्राचे प्रारुप हे कायदेशिरदृष्टया बरोबर आहे किंवा कसे, याबाबत संबंधित वन अधिका-याकडुन संदर्भ प्राप्त झाल्यावर संबंधित वन अधिका-यांनी तयार केलेल्या प्रारुपाची छाननी / तपासणी करुन आवश्यकतेनुसार सुधारणा करणे.

९. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलांकडे पाठपुरावा करणे तसेच न्यायालयीन प्रकरणांच्या अद्यावत स्थितीबाबत संबंधित वन अधिका-यांना वेळोवेळी लेखी अवगत करणे.

१०. शासनाच्या विरोधात न्यायालयीन निकाल लागल्यास, अपील / पुनर्विलोकनाची प्रक्रिया वेळीच व्हावी, याबावत दक्षता घेणे.

११. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

१२. करारनाम्याच्या कालावधीत विधी सल्लागार हा वन विभागाच्या विरोधातील कोणतेही प्रकरण हाताळणार नाही.

१३. वनविभागाच्या वतीने न्यायालयात प्रतिज्ञापत्र, परिच्छेद निहाय उत्तर दाखल करणे, व कायदे विषयक सल्ला देणे.

१४. सर्व न्यायालयीन प्रकरणांसाठी विभागीय स्तरावर नोडल ऑफिसर म्हणून काम पहाणे.

१५. कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

१६. वन्यजीव शाखेतील ज्या उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी यांची कार्यालये त्यांच्या कार्यक्षेत्राशी निगडीत वनवृत्ता पासून लांब आहेत, त्यांनी जवळच्या वनवृत्तांअतर्गत विधी सल्लागारांची सेवा प्राप्त करण्याची मुभा राहील. त्यासाठी संबंधित विधी सल्लागारांना कोणतेही अतिरिक्त शुल्क / भत्ता देय राहणार नाही.

१७. उमेदवार वन विभागाच्या आस्थापना विषयक बाबी, न्यायालयीन प्रकरणाविषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायदयाची स्थिती तथा विभागीय चौकशा इत्यादी बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

१८. वनविभागाच्या सर्व न्यायालयीन प्रकरणी पुर्ण वेळ देणे बंधनकारक राहील,

१९. उमेदवाराचे मुख्यालय ठाणे येथे राहील.

3) नियुक्तीचा कालावधी :-

प्रथम टप्प्यात देण्यात येणारी नियुक्ती 12 महिन्याकरिता राहील परंतु करार पद्धतीने नियुक्त केलेल्या अधिका-यांचे काम समाधानकारक आढळुन आल्यास पुढील कालावधीकरिता अटी व शर्ती न बदलता नियुक्ती कालावधी वाढविण्यात येईल. हा कालावधी 3 वर्षापेक्षा जास्त नसेल. काम समाधानकारक नसल्याचे आढळुन आल्यास नियुक्तीचा कालावधी कमी देखिल करण्यात येईल.

4) इतर अटी व शर्ती :-

अ) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावुन घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.
ब) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
क) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.
ड) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.
इ) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
फ) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.
ग) संगणकाचे ज्ञान असलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल.
ह) प्राप्त झालेले अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचे तसेच सदर प्रक्रिया थांबविण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.

5) वेतन :-

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2715/प्र.क्र.100/13, दिनांक 17/12/2016 सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे परिगणित करण्यात येईल.

6) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या 65 व्या वर्षापर्यन्तच कार्यरत राहू शकतील .

7) निवड करण्यात येणा-या अधिका-यास/व्यक्तीस या कार्यालयाकडुन निश्चित केलेल्या विहित नमुन्यात रुपये 100/- चे स्टॅप पेपरवर बंधपत्र सादर करावे लागेल.

8) अर्जदाराने स्वहस्ताक्षरात लिहिलेला/टंकलिखित अर्ज (संपुर्ण माहिती असलेला जसे संपुर्ण नाव, जन्मतारीख, पत्ता, शिक्षण, अनुभव, काम केलेल्या विभागाचे नाव इत्यादी) दिनांक 09/01/2020 ते दिनांक 18/01/2020 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत कार्यालयीन कामकाजा दिवशी कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावा.

9) सोबत अर्जाचा नमुना जोडला आहे.

अर्जदारासाठी इतर आवश्यक सूचना
अ) ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते लिफाफयावर स्पष्ट नमूद करावे.

ब) निवड प्रक्रीयेत अयशस्वी ठरलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांचे बाबतीत कोणताही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

स्वाक्षरी/-
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)**
**ठाणे**

अर्जाचा नमुना

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे
वनभवन, मायक्रोवेव्ह टॉवर जवळ, कोपरीगांव,
बारा बंगला एरिया, ठाणे (पुर्व), पिन कोड - 400 603.

फोटो

विषय :- शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पद्धतीने
विवक्षित कामासाठी घेणे बाबत. -- सेवा करार पध्दतीने विधी सल्लागार यांची नियुक्ती.

संदर्भ :- वन विभागाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध झालेली जाहिरात.

महोदय,

मी आपली संदर्भिय जाहिरात व संकेतस्थळावरील तपशिलवार जाहीरात बाचली असुन, माझा वैयक्तिक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. संपुर्ण नाव :-

2. जन्मतारीख अक्षरी व अंकी :-

3. ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नाव :-

4. संपुर्ण पत्ता व मोबाईल/संपर्क क्रमांक/इमेल आयडी :-

5. शैक्षणिक अर्हता :-
   अ) कायदेविषयक अर्हता :
   ब) सनद क्रमांक व दिनांक :
   क) सनद जारी करणारे प्राधिकरण :

6. अनुभव :-
   अ) सेवानिवृत्त अधिकारी असल्यास सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेले पद

   ब) एकुण सेवेचा कालावधी (वर्ष)

   क) सेवानिवृत्तीचा दिनांक

   ड) सेवाकालावधीत कार्यरत असलेल्या पदाचा तपशिल

| अ.क्र. | पदनाम | सेवाकालावधी | ठिकाण |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

इ) विधी व्यवसायी (वकिली) असल्यास व्यवसाय सुरु केल्याचा दिनांक

फ) विधी व्यवसायी (वकिली) अनुभवाचा कालावधी

ग) विधी व्यवसायी असल्यास त्याबाबतची संक्षिप्त टिप्पणी ठिकाणांसह.

८) इतर पुरवणी माहिती :

अर्जदाराची स्वाक्षरी व दिनांक

## प्रमाणपत्र

मी याव्दारे प्रमाणीत करतो/ करते की, या अर्जामध्ये नमुद केलेली माझी माहिती ही पुर्णपणे खरी आहे. माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास नेमणुकीचे प्रक्रियेमधुन वगळण्यास पात्र राहीन. आपण प्रसिद्ध केलेल्या जाहीरातीमधील नमुद केलेल्या शासन निर्णयातील अटी शर्तीचे वाचन केले असुन ते मला पुर्णपणे मान्य आहेत.

दिनांक :
स्थळ :

स्वाक्षरी/-
( अर्जदाराचे संपुर्ण नांव)

<u>मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक), ठाणे यांचे कार्यालय</u>

<u>जाहीरात</u>

**शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा विवक्षित कामाकरिता सेवा करार पध्दतीने घेणे बाबत.**

ठाणे वनवृत्तांतर्गत सर्व वनविभाग तसेच उप वनसंरक्षक (वन्यजीव), ठाणे या विभागांसाठी वनविभागातील जमीन विषयक, वनगुन्हे, आस्थापना विषयक तसेच इतर न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणाचा तातडीने पाठपुरावा करुन निपटारा करण्यासाठी तसेच इतर विवक्षित सेवा/कामासाठी एमपॅनलमेंट (Empanelment) करुन सेवानिवृत्त अधिकारी ज्यांना विधी विषयक कामकाजाचा अनुभव आहे / सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, सेवानिवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, सेवानिवृत्त प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी दिनांक 17/12/2016 च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती पुर्ण करीत असलेल्या इच्छूक व पात्र सेवानिवृत्त अधिकारी यांचेकडुन अर्ज मागविण्यात आले असून सविस्तर जाहीरात www.mahaforest.nic.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

तरी पात्र व इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांचे विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक <u>18/01/2020</u> पावेतो संकेतस्थळावर नमूद केलेल्या पत्यावर सांयकाळी 5.00 वाजेपर्यन्त किंवा तत्पूर्वी पोहचतील अशा वेताने पाठवावे.

ठाणे, दिनांक 08/01/2020

(नरेश झुरमुरे)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
ठाणे.